# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महपालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk11.dte@gmail.com Internet :http/www.dtemaharashtra.gov.in


**कालमर्यादित/तातडीचे**

क्रमांक : ११/तंशि/एमआयएस/२०१५/८०० 
दिनांक : १०/०८/२०१५

प्रति,

१) प्राचार्य
सर्व शासकीय अभियांत्रिकी व
औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,

२) प्राचार्य
सर्व शासकीय तंत्र निकेतने व तत्सम संस्था.

विषय :- एमआयएस प्रणाली संदर्भात.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संचालनालयाच्या अधिनस्त कार्यालये व संस्था यांचेसाठी विकसीत केलेली एमआयएस प्रणाली यापूर्वीच कार्यान्वित केली असून संस्थांना माहिती भरण्याच्या सूचना वेळोवेळी देण्यात आल्या आहेत. ही माहिती भरताना संस्थांना येणाऱ्या अडचणी / तांत्रिक समस्या यांचे प्रत्यक्ष निराकरण करण्यासाठी दिनांक २७ व २८ जुलै,२०१५ या दोन दिवशी पुणे येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळे दरम्यान संस्थेच्या प्रतिनिधींनी निदर्शनास आणलेल्या तांत्रिक अडचणींचे संबंधित कंपनीव्दारा निराकरण झाल्याचे कळविले आहे. आता संस्थेच्या प्रतिनिधीने उर्वरित माहिती संकलनाचे काम पूर्ण करावयाचे आहे. यासाठी विविध विभागांकडून आवश्यक असलेली माहिती एमआयएस को-ऑर्डिनेटर यांना उपलब्ध करुन देणे ही प्राचार्यांची जबाबदारी राहिल. प्राचार्यांनी याबाबत वेळोवेळी आढावा घेऊन सदर काम प्राधान्याने पूर्ण करुन घ्यावे. सदर डाटा एन्ट्रीचे काम दिनांक १७ ऑगस्ट,२०१५ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

कार्यशाळे दरम्यान कळविल्यानुसार सर्व प्राचार्यांची मा.प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. सर्व प्राचार्यांनी व्यक्तीशः सदर बैठकीत केलेल्या कार्यवाहीचा अहवालः मा.प्रधान सचिवांना सादर करावयाचा असल्यामुळे सदरील कामास विलंब झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थेतील प्राचार्यांची राहिल.

(डॉ.सुभाष महाजन)
संचालक
तंत्र शिक्षण, म. रा., मुंबई.

प्रत : सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, यांना कळविण्यात येते की, यासंदर्भात योग्य त्या सूचना आपल्या अधिनस्त सर्व संस्थांना द्याव्यात.

mis

प्र.क्र. विउअ/प्रोग्रा/२०१५/1994
दिनांक :- 11 AUG 2015

प्रतिलिपी :-
प्राचार्य, शा. आर्कि.महा अमरावती / शा. औ. नि. शा. महा अमरावती
प्राचार्य, शा. तंत्रनिकेतन, अमरावती / यवतमाळ / खामगाव / वाशीम / मुर्तीजापूर
शा. विदर्भ महिला तंत्रनिकेतन यवतमाळ, यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.

सहसंचालक
तंत्र शिक्षण, अमरावती.